Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 2 | Aug – 2015

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे राजकारण

श्याम देशमु□

संशोध□ विदयार्थी राज्यशास्त्र विभाग,डॉ.बा. आं. म. विद्यापीठ, औरंगाबाद.

प्रस्तावना :



भारत हे संघराज्य आहे. येथील सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा विचार केल्यास खूप मोठी प्रादेशिक विषमतेची दरी दिसून येते. नैसर्गिक साधन संपत्तीच्या उपलब्धतेतील तफावत तसेच पायाभूत सुविधांचा अभाव, औद्योगिकीरणाचा अभाव, आरोग्य, शिक्षण, रोजगार यासारख्या घटकांचा अभाव या मानव निर्मित कारणांमुळे प्रादेशिक विषमतेत वाढ होते. भारतीय संघराज्य निर्मितीचा विकास इंग्रज शासन काळातच झाला होता. ब्रिटिश सत्तेविरूद्धच्या दीर्घकाळच्या आंदोलनानंतर १५ ऑगस्ट १९४७ ला फाळणीच्या माध्यमातून भारताला स्वातंत्र्य मिळाले. साहजिकच स्वदेशी राज्यकर्त्यांकडून इच्छा, आकांक्षा, आशा, अपेक्षा आणि त्याची पूर्तता याबद्दलची जनतेची अपेक्षा पूर्ण करणे या विविधतेने नटलेल्या देशात एक मोठे आव्हान होते. त्यातून व राज्य कारभाराच्या सोयीसाठी पहिले महत्त्वाचे पाऊल पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना उचलावे लागले ते राज्यपूनर्रचनेचे विविध बाजूंनी अभ्यास व विचार करून निर्णयांती भाषावार प्रांतरचना अस्तित्वात आली. १९५६ ला भाषावार प्रांतरचनेच्या माध्यमातून देशातील आंध्रप्रदेश हे पहिले घटक राज्य बनले. भारतीय संघराज्यात भाषेच्या आधारावर राज्य निर्मिती जरी झाली असली तरी या पर्यायाने देखील १०० टक्के भाषिक अस्तित्व धारण करणारे समूह संतुष्ट असणे शक्य नव्हते.'[१]

राज्यपूनर्रचना ज्या निश्चित आधारभूत तत्त्वावर करण्यात आली. त्यावेळी प्रादेशिक असंतूलन तसेच भिन्न-भिन्न अस्मिता व उपसंस्कृती विषयक तर्कनिष्ठ अशा आधाराकडे दूर्लक्ष करण्यात आले परिणामत:या प्रश्नावर विशेषत: स्वायतत्ता व असंतुलन हे ज्वलंत प्रश्न निर्मा□ झाले. तसेच प्रादेशिक आंदोलनाच्या तीव्रतेमुळे विवश होऊन अनेक नव्या राज्यांची निर्मिती करावी लागली. भाषावर प्रांतरचनेपूर्वी मराठी भाषिक समूह तीन वेगवेगळ्या प्रांतात विभागला गेला होता. त्यामुळे मराठी भाषिकांच्या अस्मितेसाठी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ निर्मा□ झाली होती. या चळवळीच्या दीर्घकाळाच्या संघर्षानंतर मुंबईसह मराठी भाषिकांचे १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. विदर्भ, मराठवाडा स्वातंत्र्यापूर्व इंग्रज व निजामी राजवटीखाली होते. ते मागास प्रदेश म्हणूनच पूर्वापार ओळखले जात. मात्र मराठी भाषिक समूहाच्या अस्मितेपोठी ते महाराष्ट्रात सामील झाले त्याकरिता नागपूर करार निर्मा□ झाला. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी समतोल विकासाची व समान न्यायाची हमी त्यावेळी दिली होती. परंतु त्यांच्यानंतरच्या राज्यकर्त्यांनी आपले प्रादेशिक राजकारण अधिक घट्ट करण्याच्या भुमिकेतून या प्रदेशाकडे साफ दुर्लक्ष केल्याचे वर्षानुवर्षापासून सिद्ध होते आहे. आज सुमारे ५० ते ५५ वर्षांच्या अनुभवानंतर हे लक्षात येते की, केवळ एक भाषा असली म्हणजे राज्यात न्याय प्रस्थापित होतो असे नाही. विकासाच्या प्रक्रियेला प्रादेशिकता, संस्कृती, सामाजिकता इत्यादी घटक तितकेच महत्त्वाचे आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे विविध प्रदेशातील स्वभाषी लोकांवरच अन्याय □र□यासारखे होते.[२]

महाराष्ट्र निर्माण झाला त्यावेळी महाराष्ट्रातील मराठवाडा, खान्देश, कोकण, पश्चिम महाराष्ट्र व विदर्भ अशा प्रादेशिक विभा□ी-ना भाषिक तत्त्वावर एकत्र जोडण्यात आले. कालांतराने या प्रादेशिक विभागांना सारख्या पद्धतीची वागणूक मिळाली नाही. त्यांचा परिणाम असा झ ाला की, महाराष्ट्रात विकासाच्या बाबतीत प्रादेशिक असमातेल निर्माण झाला. हा प्रादेशिक असमतोल दूर करणे, महाराष्ट्र राज्याच्या आवाक्याच्या बाहेरही नाही. त्यासाठी प्रशासकीय व आर्थिक बाबतीतील सामर्थ्य महाराष्ट्रत आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाच्या राजकारणाचा अभ्यास करत असतांना प्रामुख्याने खालील उद्दिष्ट्ये ठेवण्यात आली आहे.

१) महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास करणे.
२) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे स्वरूप अभ्यासणे.
३) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाच्या कारणाचा शोध घेणे.

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे राजकारण

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासुन आजपर्यंत बराच मोठा कालावधी लोटला आहे. या काळामध्ये आज महाराष्ट्र राज्य देशातील एक प्रगत व पुरोगामी राज्य म्हणून नावारूपाला आहे आले. महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक वातावरण इतर राज्याच्या मानाने चांगले आहे. हेही खरे आहे महाराष्ट्राने अनेक क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती साधली आहे. हेही एक वास्तव आहे. परंतु एकीकडे प्रगतीचा आणि विकासाचा आलेख असा चढता असतांना दुसरीकडे महाराष्ट्रातील मागास प्रदेशाच्या नागरिकांच्या मनातील आणि वास्तवातील उपेक्षेची नि अन्यायाची भावना दूर करण्याचे सार्थक प्रयत्न महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व प्रगल्भ नेते ना. यशवंतराव चव्हाण, ना. वसंतराव नाईक, ना. शंकरराव चव्हाण यांच्यानंतर झालेच नाहीत, असे म्हणता येत नसले तरी, विश्वासाची ही दूर करण्यात फारशे यश आले नाही. हे वास्तव आहे. समाज पातळीवरही असे दिसते की, एका बाजूला पश्चिम महाराष्ट्र, कोकण या प्रदेशातील लोकांच्या मनात मराठवाडा, विदर्भ, खान्देश या मागास, अप्रगत प्रदेशातील जनता व नेतृत्व यांच्याकर्तबगारीविषयी, संस्थांविषयी त्यांच्या गुणवत्तेविषयी शंका आहे तर दुसरीकडे मागास प्रदेशातील लोकांच्या मनामध्ये या विकसित प्रदेशामुळे आपला विकास होत नाही. ते सातत्याने आपली उपेक्षा करतात आपल्यावर अन्याय करता अशी भावना वाढीस लागली आहे. महाराष्ट्रातील प्रगत प्रदेश व मागास प्रदेश यांच्यातील हा जो एक अविश्वास, गैरसमज, पूर्वग्रह मराठी माह□सामध्ये □ल्या पन्नास वर्षात वाढला, जोपासला गेला तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक, भाषिक आणि राजकीय ऐक्याला धोकादायक आहे.[३] मराठी माणसे एका राज्यात राहुन, एकभाषेचे असून एकमेकाला परीकत्वाप्रमाणे पाहतात. हे निश्चितपणे शुभलक्षण नाही. दुर्दैवाने या धोक्याकडे आज कुणीही गांभीर्याने पाहतांना दिसत नाही. ही खुप मोठी शोकांतिका आहे.

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे स्वरूप :

महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, खान्देश या मागास प्रदेशांचा गेल्या पन्नास वर्षात विकास झालाच नाही. हे म्हणणे अवास्तव ठरेल. पण त्याचबरोबर गेल्या पन्नास वर्षात त्यांचा असमतोल व समन्यायी पद्धतीने विकास झाला नाही. हेही धडधडीत सत्य आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये आज जो विकास झाला आहे तो प्रामुख्याने विकेंद्रीत स्वरूपाचा न होता केंद्रीत स्वरूपाचा झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये झालेला वि□ास हा प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्र व कोकणामध्ये झालेला दिसतो तर मराठवाडा, विदर्भ व खान्देश हे प्रदेश विकसाच्या प्रक्रियेमध्ये अप्रगत व मागासलेले म्हणुनच ओळखले जातात. "केवळ उत्पादन वाढले म्हणजे विकास झाला. असे मानणे पुर्णत: चुकच आहे. ज्या विकासात विषमता वाढत असेल आणि विषमता वाढीचा वेगही वाढत असेल तर त्याला विकास म्हणणे ही दिशाभूल आहे."[४]

महाराष्ट्र राज्यामध्ये झालेला विकास व त्या विकासाच्या प्रि□येमध्ये नि-र्मा□ झालेला असमतोल पाहण्यासाठी प्रामुख्याने पुढील तक्ता महत्त्वपूर्ण ठरेल.

तक्ता क्र.१
विकासाचे आर्थिक व सामाजिक असंतुलन

(सरासरी टक्केवारीमध्ये)

अ.क्र.	विभा□	उर्वरित महाराष्ट्र	विदर्भ	मराठवाडा
१	दरडोई उत्पन्न (रुपये)	८१७१९	५७०७९	४९६५३
२	दरडोई उत्पन्न वाढीचा दर	१३	१२	११
३	मा-नव वि□ास दर	०.७७	०.७२	०.६९
४	सिंचन (खर्चाच्या तुलनेत सिंचनाखालील लाभ □त्र)	७६	४७	३८
५	शेती-शेतीपूरक बाबीसाठी कर्ज उपलब्ध	१००	६१	५४
६	लोकसंख्येनुसार उद्योगाचे प्रमाण	१००	४२	२८
७	सेवा क्षेत्रातील योगदान	१००	५२	३७
८	रेल्वे जाळ्याची घनता	१००	९९	७२
९	रस्त्याची घनता	१००	७०	९१
१०	शिक्षण स्थिती निर्देशांक	८५	८७	७२

११	साक्षरता दर	८२	८३	७६
१२	आवश्यकतेनुसार आरोग्य केंद्रे	८९	९६	८१

संदर्भ : दिव्य मराठी (अर्थप्रवाह २० एप्रिल २०१५)

वरील तक्त्याच्या अभ्यासावरून असे दिसून येते की, महाराष्ट्र राज्याचा झालेला विकास तो □ठल्याही क्षेत्रातील असो तो समन्यायी पद्धतीने झालेला -नाही.[५] त्यामुळेच महाराष्ट्र राज्यामध्ये विकासाच्या संदर्भात प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे.

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल निर्माण होण्याची कारणे :

महाराष्ट्र राज्यामध्ये निर्माण झालेला प्रादेशिक असमतोल हा कुठल्याही एका कारणामुळे निर्माण न होता त्यासाठी अनेक कारणे □रणीभूत ठरली आहे.

१) भौ□ोलि□ □रर□ :

महाराष्ट्र राज्याची भौगोलिक रचना, साधन सामग्रीची उपलब्धता, हवामान इत्यादी घटकांचा त्या प्रदेशातील विकास प्रक्रियेवर प्रभाव पडत असतो. उदा. उद्योगाच्या वाढीसाठी महाराष्ट्रामध्ये भौगोलिक विविधता असल्यामुळे महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलामध्ये भर पडते आहे.

२) ऐतिहासिक कारणे :

महाराष्ट्र राज्याच्या ज्या प्रदेशावर स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांचे राज्य होते तिथे त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक विकासाची प्रक्रिया सुरु केली होती पण महाराष्ट्राच्या ज्या प्रदेशावर विशेषत: महराठवाड्यावर निजामाची राजवड असल्यामुळे या प्रदेशामध्ये ती विकासाची प्रि□या सुरु झाली नव्हती, म्हणून हा प्रदेश अजूनही मागासलेला आहे.

३) आर्थिक कारणे :

ज्या ठिकाणी बँक, वित्तपुरवठा करणाऱ्या संस्था, दळणवळण व वाहतुकीची साधने, विमा कंपन्या, नियमित व उच्चदाबाची वीज, गुंतवणूक कंपन्या, बाजारपेठ इत्यादी घटक उपलब्ध आहेत अशाच ठिकाणी महाराष्ट्रात उद्योगाचे केंद्रीकरण झाले.

४) सामाजिक कारणे :

पश्चिम महाराष्ट्र व कोकणामध्ये सामाजिक सुधारणेचे प्रमाण जास्त असल्यामुळे तेथील सामाजिक व राजकीय सुधारणांना मोठ्या प्रमणावर चालना मिळाली त्यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढले. त्यातुन वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लागला. त्यातुन उद्योजकता व साहसीवृत्ती निर्मा□ झाली व त्यातुन विकासाच्या प्रक्रियेस सुरुवात झाली. दुर्दैवाने महाराष्ट्राच्या इतर प्रदेशामध्ये यासाठी खुप कालावधी लागला. म्हणून ते विकासाच्या प्रक्रियेपासून लांब आहे.

५) राजकीय कारणे :

महाराष्ट्राच्या आर्थिक विकसाची गती योग्य व महत्त्वकांक्षी राजकीय नेतृत्त्वावर अवलंबून आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या विकासामध्ये या विभागातील परिसर विकासाची योग्य दृष्टी व तळमळ असणाऱ्या अनेक राजकीय नेत्यांचा सिंहाचा वाटा आहे. दुर्दैवाने मराठवाडा, विदर्भाची अस्मिता असलेले विकासाची दृष्टी असणारे नि:स्वार्थी नेतृत्व अपवादानेच लाभले.[६]

समारोप :

महाराष्ट्र राज्याने स्थापनेपासून आजपर्यंत अनेक क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती साधली आहे. आणि उत्तरोउत्तर होत आहे. ही महाराष्ट्राच्या जनतेसाठी व नेतृत्वासाठी अभिमानास्पद गोष्ट आहे. ज्यामुळे महाराष्ट्राकडे एक सुखी व समृद्धी राज्य म्हणून पाहिले जाते. पण महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलामुळे महाराष्ट्राच्या पुरोगामी आणि अभिमानस्पद वाटचालीस छेद बसत आहे. एका बाजूला चकचकीत व चमकती शहरे. मुठभर उच्चभ्रुंची लखलखती प्रसादे नि सुखसंपन्न चेहरे आणि दुसऱ्या बाजुला दुर्बल, विकलांग, गलितगात्र खेडी-□ामी□ □षी संस्कृतीतील

शेतकरी आणि शहरी झोपडपट्यातील घामाने ओथंबलेले कष्टकरी आहेत त्या स्थितीत त्यांना तसेच ठेऊन खोटा-भासमा-न वि□ास झाल्याचे भ्रामक चित्र निर्माण करणे धोकादायक होते व हा विद्रुप विकास महाराष्टाला परवडणारा नाही.

संदर्भ :

१) पेंडसे लालजी. "महाराष्ट्राचे महामंथन" साहित्य सरकार संघ प्रकाशन दुसरी आवृत्ती.२०१०
२) पाटील एस.के., 'महाराष्ट्राचा सामाजिक व राजकीय विकास', विद्या प्रकाशन, औरंगाबाद./पेडसे ल.
३) सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र विशेषांक लोकराज्य, एप्रिल-मे,२०१०
४) दांडेकर समितीचा अहवाल व केळकर समितीचा अहवाल.
५) दिव्य मराठी (अर्थप्रवाह) २० एप्रिल २०१५ व महाराष्ट्राची आर्थिक पाह□ी २०११-२०१२
६) डॉ.र.पु. कुरुलकर, 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था', विद्या प्रकाशन नागपूर,२००६.

श्याम देशमु□ी
संशोध□ विदयार्थी राज्यशास्त्र विभाग,डॉ.बा. आं. म. विद्यापीठ, औरंगाबाद.